# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.

## प्रसिध्दीपत्रक

१. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क या संवर्गातील १७ रिक्त पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन दि.८-१२-२०२५ ते दि.२२-१२-२०२५ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने **कॉम्पुटरबेस्ड वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा दि.३०-१-२०२६ रोजी** आयोजीत करण्यात आलेली होती.

२. सदर कॉम्पुटर बेस्ड वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेच्या उत्तरतालिका व प्रश्नतालिका पाहण्याची तसेच प्रश्नतालिका /उत्तरतालिका याबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याबाबतची ऑनलाईन सुविधा शुक्रवार **दि.६-२-२०२६ ते दि.९-२-२०२६** पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर सुविधेसाठी उमेदवारांनी https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर विहीत आयडी व पासवर्डव्दारे लॉग इन करावे. **सदर परीक्षेच्या अनुषंगाने प्रश्नतालिका किंवा उत्तर तालिके बाबत आक्षेप असल्यास, उमेदवारांनी असे आक्षेप केवळ ऑनलाईन पध्दतीनेच आवश्यक त्या कागदपत्रांसह दि.९-२-२०२६ पर्यंत सादर करावेत. दि.९-२-२०२६ नंतर कोणत्याही स्वरुपाचे आक्षेप स्विकारण्यात येणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

३. उक्त नमुद परीक्षेच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद करण्यात आलेल्या विहीत **ऑनलाईन पध्दतीनुसारच प्रश्नतालिका किंवा उत्तर तालिकेवर आक्षेप स्विकारण्यात येणार आहेत. इतर कोणत्याही पध्दतीने (लेखी पत्र/ निवेदन/ ईमेल/भ्रमणध्वनी व्दारे/एसएमएस) सादर केलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.**

४. संबधित उमेदवारांकडुन प्रत्येक आक्षेपाकरीता **रु.१००/-** इतके शुल्क केवळ ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येणार आहे. ऑनलाईन शुल्क सादर न केल्यास संबधित उमेदवारांचे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. **परीक्षेच्या अनुषंगाने प्राप्त आक्षेपाबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा निर्णय अंतिम राहील याची सर्व उमदेवारांनी नोंद घ्यावी.**

५. सदर भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात येत असून उमदेवारांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच कोणत्याही व्यक्तीने सदर भरती प्रक्रियेबाबत गैरमार्गाने नोकरी देण्याचे/परीक्षा पास करुन देण्याचे किंवा तत्सम स्वरुपाचे आमिष दाखविल्यास अशा भूलथापांना बळी न पडता त्याबाबत नजिकच्या पोलीस स्टेशनकडे तात्काळ संपर्क साधून तक्रार करण्यात यावी.

६. भरती प्रक्रियेशी संबधीत अदयावत सूचना/प्रसिध्दीपत्रक याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या https://www.wcdcommpune.com संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देण्याबाबत सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी व ईमेलवर वेळोवेळी पाठविण्यात येणा-या सूचनांचे उमेदवारांनी पालन करावे.

Commissionerate of Women & Child Development, Math. State.Pune

७. https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर लॉगिन करताना तांत्रिक अडचणी आल्यास संबधित उमेदवारांनी **०२२-६१० ८७५ ४२१** या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. सदर टोल फ्री क्रमांक सोमवार ते शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत सुरु राहील.

दिनांक :-५/०२/२०२६

स्थळ :- पुणे

Commissionerate of Women & Child Development * Mah. State Pune 1 *

**(नयना अर्जुन गुंडे)** भा.प्र.से

**आयुक्त**

**महिला बाल विकास**

**महाराष्ट्र राज्य, पुणे**



F:\nikhil 1-6-2024\All Word fils\EST-6